**प्रेसनोट दि.२५/०७/२०१९**

**मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.**

**कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत पोलीसांतर्फे लोणकर माध्यमीक विद्यालय, मुंढवा येथे कार्यक्रमाचे आयोजन करुन मुलांना स्वसुरक्षेबाबत धडे देण्यात आले.**

दि.२४/०७/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील लोणकर माध्यमिक विद्यालय, मुंढवा, पुणे येथे मुंढवा पोलीस ठाणे कडील अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यार्थ्याकरीता कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. त्यामध्ये पोलीस ठाणेकडील महिला पोलीस उप निरीक्षक, शुभांगी नरके, पोलीस हवालदार नरके, महिला पोलीस नाईक चौधर, पोलीस नाईक आहेर यांनी मुलांना संबोधन केले.

सदर कार्यक्रमामध्ये नमूद पोलीस कर्मचारी यांनी विद्यार्थी यांना मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सुरू केलेल्या भरोसा सेल, पोलीस काका, बडीकॉप, जेष्ठ नागरीक व महिला, बालक यांची सुरक्षा अशा व इतर विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. त्याचप्रमाणे कुमार वयातील शारीरिक, मानसिक, सामाजीक, भावनीक बदल, प्रेम, मैत्रि, आकर्षण याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच छेडछाळ, व्यसनाधिनीता, बाल लैंगिक अत्याचार व कायदा, ताण तणाव, भावणा वर्तन, वाहतुकीचे नियम याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाबाबत शाळेचे प्राचार्य व शिक्षक स्टाफ यांनी कौतुक करुन अशा प्रकारे लहान मुलांना समाजीक बांधीलकी याची जाणीव करुन देणे व स्वतः चे रक्षण करणे हे काळानुरुप अत्यंत जरुरीचे असून, अशा प्रकारचे कार्यक्रम यापुढे वेळोवेळी राबविण्यात यावेत याबाबत विनंती केली.

तरी नमूद पोलीस अधिकारी व कर्मचायांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**(संपतराव डी. भोसले)**<br>
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**<br>
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**





